# कार्यालय नगरपंचायत बेसा-पिपळा

## ता. जि. नागपुर

जा.क्र.न.पं.बे.-पि./बांध./का.वि./ १३१२/२०२६
कार्यालय नगर पंचायत बेसा-पिपळा
दिनांक :-०८/०५/२०२६

## निविदा सूचना

मुख्याधिकारी नगर पंचायत बेसा पिपळा, जि. नागपूर यांचा वतीने नगर पंचायत बेसा पिपळा हदीतील सन २०२६-२०२७ नगर पंचायत निधी/विकास निधी अनुदान योजना अंतर्गत १ कामाची बि-१ दोन लिफाफा पद्धतीने ई-निविदा पद्धतीच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे नोंदणीकृत कंत्राटदाराकडून, निविदा मागविण्यात येत आहे. वरील कामाची निविदा केवळ ई-निविदा पद्धतीने करावयाची आहे, निविदा विस्तृत नमुना महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in तसेच कार्यालयीन वेळेवर संबंधित विभाग येथे दिनांक ८/५/२०२६ पासून पाहण्यास उपलब्ध आहे.

कामाचा तपशील खालील प्रमाणे आहे

| अनु. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | अनामत रक्कम | निविदा प्रपत्र किमंत | काम करण्याचा कालावधी | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नगर पंचायत बेसा-पिपळा,क्षेत्राअंतर्गत श्वान निवारा केंद्र बांधकाम करणे. | २६,५०,१५८ | २६५०२ | २७०० | ३ महिने | योग्य त्या वर्गातील |

### ई- निविदा प्रसिद्धी तपशील

| | |
|---|---|
| ई-निविदा प्रसिद्धी | दिनांक :-०८ /०५/२०२६ |
| ई-निविदा दस्तावेज डाउनलोड | दिनांक :-०८ /०५/२०२६ ते १५/०५/२०२६ पर्यंत |
| ई-निविदा दाखल दिनांक | दिनांक :- :-०८ /०५/२०२६ ते १५/०५/२०२६ पर्यंत साय ५.०० पर्यंत |
| ई-निविदा उघडण्याचा दिनांक | दिनांक :- १८ /०५/२०२६ साय ०५.०० वाजता शक्य झाल्यास |

**अटी व शर्ती**

1. संबंधित कंत्राटदार सा. बां. विभागाकडे योग्य् वर्गात नोंदणीकृत असणे आवश्यक् आहे.
2. निविदा धारकांनी निविदा संदर्भात सर्व दस्ताऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील.
3. प्राप्त निविदा पैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा.मुख्याधिकारी यांचेकडे राखीव आहे.
4. निविदा उघडण्याच्या दिनांकापासुन कंत्राटदाराचे देकाराची वैधता कालावधी 1 वर्षाची राहील.
5. प्रत्येक कामाची बयाणा/इसारा रक्कम् व निविदा प्रपत्र डाऊनलोड केल्याची फी निविदा सुचना रकाना क्र. 4 नुसार रकमेप्रमाणे संकेत स्थळावर उपलब्ध ऑनलाईन नमुद खाते क्रमांकावर ऑनलाईन ई पेमेंट पध्दतीने (as per online payment procedure) जमा करणे बंधनकारक आहे. (संबंधित कंत्राटदारांना ऑनलाईन पेमेंट पर्यायाचा वापर करावयाचा आहे.)
6. शासन निर्णय बी.डी.ओ. 2016 प्र.क्र. 2 इमा 2 दि. 12/02/2016 नुसार (A) निविदेचा देकार निविदाधिन कामाच्या किंमतीपेक्षा 10% पर्यंत कमी दरांचा असेल तर निविदा धारकांस निविदाधिन किंमतीच्या 1% रकमेचा धनाकर्ष (डी.डी.) परफॉमर्स सेक्युरिटी म्हणुन निविदेच्या लिफाफा क्र. 2 मध्ये सादर करावा. तसेच देकार 10% पेक्षा जास्त् कमी दराने असल्यास जेवढया जास्त् कमी दराने आहे तेवढया रकमेचा व वरील बाब (A) प्रमाणे येणाऱ्या रकमेसह एकत्रित धनाकर्ष (डी.डी.) निविदेच्या लिफाफा क्र. 2 मध्ये सादर करावा.
7. लिफाफा क्र. 1 व 2 खालीलप्रमाणे

**लिफाफा क्र.1**

या लिफाफ्यात खालिल दस्ताऐवज असणे बंधनकारक आहे.

1. सार्वजनिक बांधकाम विभागाचे योग्य त्या वर्गातिल वैध पंजिकरण प्रमाणपत्र

2. पॅन कार्ड
3. आयकर रिटर्न
4. वस्तु व सेवाकर नोंदणी प्रमाणपत्र.
5. व्यवसायकर नोंदणी प्रमाणपत्र
6. मागिल वर्षापर्यंतचे व्यवसायकर ना देय प्रमाणपत्र
7. सक्षम अधिकाऱ्याचे Work Done व Work in Hand प्रमाणपत्र.
8. कामगार विमा नोंदणी प्रमाणपत्र.
9. कंत्राटदाराकडे उपलब्ध असलेल्या तांत्रिक व्यक्ती व यंत्राची यादी व परवाना प्रमाणपत्रे.
10. प्रतिज्ञापत्राची साक्षांकित प्रत.(रुपये 100/- च्या स्टॅम्पपेपरवर)
11. कामगार भविष्य निधी ( EPF ) नोंदणी प्रमाणपत्र.
12. ना-देय प्रमाणपत्र व मोक्का पाहणी अहवाल.
13. हार्ड कॉपी ( सील बंद लिफाफ्या ) मध्ये दस्तावेज सादर करणे अनिवार्य राहील.

**लिफाफा क्रमांक 2**

या लिफाफ्यात खालिल दस्ताऐवज असणे बंधनकारक आहे.

1. Bill Of Quantity
2. D.D. for Performance Security

8. सदर काम पी. डब्ल्यु.डी. हँडबुक मध्ये दिलेल्या स्टॅंडर्ड स्पेशिफिकेशनप्रमाणे तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या स्पेशिफिकेशनप्रमाणे काम करुन देण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

9. कामासाठी लागणारे खडी काळया पक्के दगडाची व दिलेल्या विहित साईज मध्ये आणुन द्यावी लागेल.

10. टेंडर मधील कोणताही आयटम कमी अगर जास्त करणे किंवा रद्दकरण्याचा अधिकार नगर पालिकेस राहील. तसेच एक्स्ट्रॉ आयटमचे दर नगरपालिका ठरवेल ते घेणे कंत्राटदारांवर बंधनकारक राहील.

11. लेबर कॉन्ट्रक्ट् ॲक्ट् नुसार आवश्यक् असलेले रजिस्ट्रेशन कंत्राटदाराने स्वखर्चाने करुन घेण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारांवर राहील.

12. नियमाप्रमाणे आयकर व ईतर शासकीय कर कंत्राटदाराने कपात करुन दयावा लागेल.

13.सदर कामांसाठी लागणारी मशिनरी न.प. कडे उपलब्ध असल्यास पी.डब्ल्यु. डी.चे दरानुसार भाड्याने देण्यात येईल.ती नगरपालिकेकडे नसल्यास कंत्राटदारांनी आणावी.

14. सदर कामावरील मजुरांना 1948 चा मिनिमम वेजेस ॲक्टमध्ये लिहिल्याप्रमाणे व शासनाची वेळोवेळी सुधारित केलेल्या दरापेक्षा कमी दराने मजुरी अदा करु नये.

15. सदर कामांसाठी लागणा-या दगड/मुरुम/विट/माती/खडी/वाळू ईत्यादी व तत्सम् साहित्य् खाणीतुन/जमिनीतुन/नवीन काढण्यासाठी आवश्यक् तो परवाना महसुल खात्याकडुन कंत्राटदाराने मिळवावा. व तत्सम् नियमांचे पालन करावे.

16. कामासाठी जर का 20 पेक्षा जास्त् कामगार ठेवण्यात येतील तर मक्तेदारास मजुर आयुक्त् यांचे कार्यालयाकडुन योग्य तो परवाना घेणे आावश्यक् आहे.

17. सदर कामासाठी आणाव्या लागणाऱ्या मटेरियलची रॉयल्टी शासनाकडे परस्पर् कंत्राटदाराने भरावयाची आहे. न भरलेली आढळल्यास ती बिलातुन कपात करण्यात येईल.

18. रस्त्यावर काम करतांना सावधानतेचा ईशारा तसेच डायव्हर्शन इ. दाखविणारे फलक तसेच कामावर लाल झेंडा , लाल लाईट इ. लावण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

19. टेंडर मध्ये दर्शविलेल्या बाबींची व त्यांच्या मोजमापाप्रमाणे करावयाची कामे ही त्या मटेरियलच्या किंमतीसह अंतर्भुत राहतील.

20. सदर बांधकामासाठी वापरावयाचे मटेरियल हे स्टॅन्डर्ड स्पेशिफिकेशन्स प्रमाणे चांगल्या प्रतीचा असे त्यापैकी जर काही कारणास्तव एखादे मटेरियल नगर परिष्द अभियंत्याने नाकारले तर सदरचे मटेरियल त्या जागेवरुन 24 तासांचे आंत कंत्राटदाराने स्वखर्चाने दुर हलविले पाहिजे तसेच सर्व कामे ही अंदाजपत्रकाप्रमाणे करणे बंधनकारक आहे असे न-केल्यास कंत्राटदारास संबंधित कंत्राटदारास योग्य तो दंड आकारण्याचे संपूर्ण अधिकारमुख्याधिकारी नगर पंचायत बेसा पिपळा यांना राहील.

21. वर्कमन काम्पेसेशन ॲक्ट् मधील सर्व तरतुदी करारनामा लिहुन देणा-यांवर बंधनकारक असतील.

22. कामाच्या देखरेखीसाठी कंत्राटदार हे तांत्रिक शैक्षणिक अर्हता धारक , माहितीगार व अनुभवी सुपवायझर नेमतील व त्याचे मार्फत ते कामावर देखरेख ठेवतील.

23. कामामध्ये कोणत्याही नविन बाबींचा समावेश नगरपरिषदेच्या पुर्व परवानगीशिवाय कंत्राटदार करणार नाही.

24. टेंडर मध्ये दिलेली मोजमापे अंदाजे असुन त्यात कमी-जास्त् होण्याची शक्यता आहे. झालेल्या कामाचे मोजमाप हे स्टॅंडर्ड मेजरमेंट नुसार घेतले जातील. व मोजमापनुसार जादा किंवा कमी-जास्त् झालेल्या परिनामानुसार बिल अदा करण्यात येईल.जादा मागणीचा विचार केला जाणार नाही तसेच सदरील काम अंदाजपत्रकापेक्षा जास्त होत असल्यास नगर पंचायत अभियंता तसेचमुख्याधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे सदरील कंत्राटदार यांना बंधनकारक राहील .

25. कंत्राटदाराचे दरमाह झालेल्या कामाचे बिल प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या तारखेला न.प. कार्यालयात सादर करेल. मध्येच बिल दिले जाणार नाही. केवळ बिल मागणी अर्ज दिल्यावर बिल दिले जाणार नाही.झालेले काम किमान रु. 50 हजार किंमतीपेक्षा जास्त् किंमतीचे झालेले असल्यास/अथवा अंदाजपत्रकिय रकमेच्या 25% काम झालेले असल्यावर व कंत्राटदारास रनिंग बिल देण्याबाबत नगरपरिषद विचार करेल .

26. कामाच्या सुरुवातीला व काम संपल्यावर कंत्राटदार जागेची सफाई करतील.

27. कामाची लाईन आऊट देतांना कंत्राटदार आवश्यक् असलेल्या खुट्या व चुना इ. मटेरियल व कामांसाठी कुशल - अकुशल कामगार पुरवतील त्याचप्रमाणे मक्तेदार ज्याठिकाणी बांधकामाचे सामान साठवले त्या जागेवर पोहच रस्ता तयार करणे हे कंत्राटदाराचे काम राहील. त्याबाबत अतिरिक्त् कोणताही चार्ज दिला जाणार नाही.

28. नगरपरिषदेच्या पुर्व परवानगीशिवाय कंत्राटदारांस काम दुस-या कंत्राटदारांस सोपविता येणार नाही. किंवा दुस-याला सब कॉन्ट्रक्ट् देता येणार नाही.तसे केल्यास कंत्राटदाराकडुन काम काढुन घेण्यात येईल.

29. काम पुर्ण झाल्यानंतर नगरपरिषदेच्या अभियंत्याला पसंतीस उतरल्यानंतर नगरपरिषदेच्या अभियंता काम पुर्ण झाल्याबाबत दाखला देईल. त्यानंतरच अंतिम बिल अदा करण्यात येईल.

30. सदरचे बांधकाम कंत्राटदार नगरपरिषदेच्या ताब्यात जोपर्यंत देणार नाही. तोपर्यंत ते कामपुर्ण झाले असे ग्राह्य धरले जाणार नाही.काम ताब्यात देणे बाबत कंत्राटदाराने नगरपरिषदेकडे लेखी स्वरुपाचा अर्ज देणे आवश्यक् आहे.

31. नगरपरिषदेने काम ताब्यात घेतल्यापासुन 12 महिन्याचे आंत ईमारतीचे बांधकामात/रस्त्याचा व अन्य् कामात काही उणिवा आढळल्यास अथवा काम खराब झालेले आढळल्यास कंत्राटदाराने त्या उणिवा स्वत: च्या खर्चाने दुरुस्ती द्यावयाचा आहेत. तसे न केल्यास कंत्राटदारांचा सुरक्षा अनामतीचा जमा रकमेतुन सदरचे काम दुस-या कंत्राटदाराकडुन करुन घेण्यात येईल. त्याबद्दल कंत्राटदारांची कोणतीही तक्रार ऐकुन घेतली जाणार नाही.सुरक्षा अनामतीपेक्षा जादा रक्कम् दुरुस्तीसाठी लागल्यास तो कंत्राटदाराकडुन वसुल करण्यात येईल.

32. टेंडर फॉर्ममध्ये दिलेल्या मुदतीमध्ये काम पुर्ण करण्याची संपुर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील. दिलेल्या मुदतीत काम पुर्ण न झाल्यास मुदतीनुतरच्या प्रत्येक दिवसासाठी रु. 500.00 मात्र नुकसान भरपाई म्हणुन आकारण्यात येईल. तथापि नगरपरिषदेस काम पुर्ण कारण्यासाठी अतिरिक्त् काळ लागल्या बद्दलचे कंत्राटदाराने दिलेले कारण संयुक्तिक वाटल्यास कंत्राटदारास कामाची मुदत वाढवुन देण्याचा अधिकार राखुन ठेवण्यात आलेला आहे. मुदत वाढीसाठी कंत्राटदाराने कामाची मुदत संपणेपुर्वी 1 महिना अगोदर लेखी अर्ज नगरपरिषदेस दिला पाहिजे.

33. बांधकामामध्ये अंदाजपत्रक व्यतरिक्त एखादी नविन बाब करुन घ्यावयाची असल्यास कंत्राटदारांनी नगरपरिषदेकडुन संबंधित बाबींचा दर अगोदर मंजुर करुन घेतला पाहिजे. तसे न केल्यास आपण केलेले काम ग्राह्य धरल्याजाणार नाही.

34. एक्वायरिंग फी, रॉयल्टी फी, जकात फी, जागेचे भाडे वगैरे कंत्राटदाराने भरावयाचा आहे.

35. जर कंत्राटदार ही एखादी फर्म किंवा कंपनी अगर सोसायटी असेल तर त्यांनी अशा सर्व सभासदांची किंवा पार्टनरच्या सह्या पदनामासह सादर केल्या पाहिजेत व तसे ठराव लेखी खुलासा वा पत्र नगरपरिषदेकडे सादर करणे आवश्यक् आहे.

36. सदर कामाचे टेंडर स्विकारल्यानंतर/मक्तेदारास लेखी कळविल्यानंतर व महाराष्ट्र शासन स्ट्म्प डूयती कायदा अन्वये 15 दिवसाचे आंत नगरपरिषदेच्या लाभात करारनामा करुन दिला पाहिजे. व ती जबाबदारी मक्तेदाराची राहील. त्याकामी आवश्यक् मी मुद्रांक फी भरण्याची जबाबदारी कंत्राटदारांची राहील व तसे न केल्यास कंत्राटदारांनी भरलेली बयाना/सुरक्षा अनामत रक्कम् जम् करण्यात येईल.

37. कंत्राटदाराने टेंडर व त्यातील शर्ती काळजीपुर्वक वाचुन समाधान झालेले आहे. व त्यानंतरच त्याने कामाचे दर भरलेले आहेत असे गृहित धरण्यात आलेले आहे.त्याबाबत कोणतेही सबब नंतर ऐकल्या जाणार नाही.टेंडरमध्ये अक्षरी दर लिहिणे आवश्यक् आहे.

38. कंत्राटदाराने भरलेली इसारा रक्कम व देयकातून कपात करण्यात आलेली सुरक्षा ठेव रक्कम (१०%) DLP कालावधी समाप्त झाल्यानंतर रीतसर अर्ज केल्यानंतर परत करण्यात येईल . DLP कालावधी हा करारनामा करतेवेळीचा लागू असलेल्या शासन निर्णया प्रमाणे गृहीत धरूनच संबंधित कंत्राटदारास सुरक्षा ठेव परत करण्यात येईल.

39. सदर बांधकामाचे टेंडर दाखवलेली एखादी बाब वगळविण्याची असेल तर वगळण्याचा अधिकार नगरपरिषदेने राखुन ठेवला आहे. अशी एखादी बाब उघडल्यास त्याबद्दल कंत्राटदारास तक्रार करण्याचा अधिकार राहणार नाही.एखादी जादा बाब करुन घ्यावयाची असल्यास ती बाब कंत्राटदाराने करुन देणे बंधनकारक आहे.ती जादा बाब न करणे बाबत कंत्राटदारांची कोणतीही सबब ऐकुन घेतली जाणार नाही.

40. वर्क ऑर्डर दिल्यानंतर जरी कंत्राटदाराने काम करण्याबाबतचा करारनामा करुन दिलेला नसेल तरी देखील सदरचे काम कंत्राटदारास वर्क ऑर्डरीत नमुद केलेल्या दरात करुन देणे बंधनकारक आहे. बाजारात दरवाढी झालेली आहे.काम परवडत नाही ही सबब ऐकल्या जाणार नाही.कंत्राटदारानी काम न केल्यास व ते दुस-यांकडुन करावे लागल्यास नुकसान भरपाईची रक्कम् कंत्राटदाराकडुन वसुल केल्या जाईल.

41. काम करीत असतांना कोणत्याही प्रकारची जिवित अथवा वित्तिय हानी किंवा कोणत्याही प्रकारचा अपघात झाल्यास सर्व जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

42. सदर निविदा प्रपत्र हा करारनामाचा भाग असेल.

43. काम सुरु करण्याच्या आधीचे तसेच काम सुरु असतांनाचेव पुर्ण झाल्याचे फोटो काढुन बिल मागणी अर्जासोबत देणे कंत्राटदारास अनिवार्य राहील.

44. सदर निविदा प्रशासकीय मान्यता आधीन राहून काढण्यात आली असून प्रशासकीय मान्यता प्राप्त होताच कार्यादेश प्रदान करण्यात येईल.

45.विहित मुदतीत काम पूर्ण केल्याचे कमीत कमी ३ प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

46.कार्यादेश दिल्यापासून विहित मुदतीत काम पूर्ण करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील त्यानंतर जास्तीस जास्त १ महिना मुदत वाढ मिळेल त्यापेक्षा जास्त कामाला उशीर झाल्यास कंत्राटदारास कोणतेही देयके अदा करण्यात येणार नाही.

47. महाराष्ट्र शासनामार्फत विकास कामा बाबत वेळो वेळी निर्गमित करण्यात येणारे शासन आदेशाचे पालन करूनच काम करणे हे कंत्राटदारास बंधनकारक राहील त्या मध्ये कुठलाही प्रकारे बदल करण्यात येणार नाही.

48. नगर पंचायत कार्यालय मध्ये भरण्यात येणारी २% अनामत रक्कम हि FD किंवा धनादेशाद्वारे भरणा करण्यात यावी.

49.प्रत्येक कामाचेत्रयस्थ पक्ष तपासणी V.N.I.T. नागपूर यांच्या कडून करणे बंधनकारक राहील.

50. कामाच्या दर्जाबाबत कोणत्याही प्रकारचा हलगर्जी पणा खपवून घेतल्याजाणार नाही.

(भारत बा.नंदनवार)
मुख्याधिकारी
नगर पंचायत बेसा पिपळा

Signature Not Verified
Digitally signed by Vijaykumar Baburao Surwase
Date: 2026.05.08 16:14:39 IST
Location: Maharashtra-MH